# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १३/०३/२०२५ (गुरूवार) दुपार

---

**अवैध दारू, अंमलीपदार्था बाबत, ड्रंक ॲन्ड ड्राईव्ह बाबत कारवाई नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांची विशेष मोहीम**

**७९ आरोपीविरूध्द अवैध दारू बाबत गुन्हे नोंद एकुण १२,४४,०९०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त अंमलीपदार्थ सेवन करणाऱ्या ११ आरोपीविरूध्द कारवाई , ३८ ड्रंक ॲन्ड ड्राईव्ह केसेस**

सध्या सुरू असलेल्या सणोउत्सोव दरम्यान काही अनुचित प्रकार घडणार नाही या करीता नागपुर ग्रामीण जिल्हयाचे पोलीस अधीक्षक मा. श्री. हर्ष पोद्दार यांनी गंभीर दखल घेवुन सातत्याने अवैध धंदयावर कारवाईचे आदेश दिले आहे. नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत **दिनांक १२/०३/२०२५** रोजी **दारूबंदी कायदाअंतर्गत तसेच एनडीपीएस कायदयान्वये, ड्रंक ॲन्ड ड्राईव्ह** कारवाई बाबत विशेष मोहीम राबविली असुन सदर मोहीमेदरम्यान स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांच्या सह पोलीस स्टेशन केळवद —११ कारवाई, खापा—०५ कारवाई, सावनेर—०३ कारवाई, कळमेश्वर —१२ कारवाई, देवलापार — ०१ कारवाई, रामटेक—०१ कारवाई, जलालखेडा—०१ कारवाई,काटोल—०८ कारवाई, नरखेड—०४ कारवाई, वेलतुर—०३ कारवाई, कुही—०६ कारवाई, उमरेड—०६ कारवाई, खापरखेडा—०५ कारवाई, कन्हान—०२ कारवाई, मौदा—०४ कारवाई, एमआयडीसी बोरी—०३ कारवाई, बेला—०२ कारवाई , बोरी —०२ कारवाई अश्या पोलीस स्टेशन अंतर्गत पोलीसांनी अवैध दारू बाबत कारावाई केल्या. सदर कारवाईत **१,१२,६८० मि.ली. देशी दारू , १,३५४ लिटर मोहाफुल दारू, १८,२३० लिटर मोहाफुल सडवा , ८१,२७० मि. ली विदेशी दारू, ९,१०० मि.ली बियर इतर साहीत्यासह ३ मोटर सायकल असा**

**एकुण १२,४४,०९०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ७९ आरोपीतांवर ७९ गुन्हे दाखल केले आहे.**

**सदर मोहीमेअंतर्गत दिनांक १२/०३/२०२५ रोजी** सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या **११ अरोपीतांविरूध्द एनडीपीएस कायदया** अन्वये कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच मदयपान करून वाहन चालविणाऱ्यांवर **एकूण ३८ ड्रंक ॲन्ड ड्राईव्ह केसेस करण्यात आल्या आहेत.**